Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 10 November 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १० नोव्हेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

देशाचे सरन्यायाधीश म्हणून उद्या न्यायमूर्ती संजीव खन्ना पदभार स्वीकारणार आहेत. न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड आज अधिकृतपणे या पदावरुन निवृत्त होत आहेत. न्यायमूर्ती चंद्रचूड यांचा काल न्यायालयातला शेवटचा कार्यालयीन कामकाज दिवस होता. चंद्रचूड यांनी दिलेल्या काही महत्त्वाच्या निकालांमध्ये अयोध्या राम मंदिर जमीन वाद, प्रौढांचे समलिंगी संबंध तसंच अविवाहित महिलांचा गर्भपाताचा अधिकार अशा महत्वाच्या निर्णयांचा समावेश आहे.

****

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षातर्फे जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. थोड्यावेळापुर्वीच हा कार्यक्रम सुरु झाला आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते –केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, राज्यातील नेते–उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह पक्षाचे केंद्रासह राज्यातील मंत्री, नेते या कार्यक्रमाला उपस्थित आहे. दरम्यान, अमित शहा राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी आज जळगाव, बुलडाणा आणि अमरावती याठिकाणी प्रचारसभा घेणार आहेत.

****

दरम्यान, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे देखील आज मुंबईत महाविकास आघाडीचा घोषणापत्र जारी करणार आहेत. काँग्रेसचे सचिव के. सी. वेणुगोपाल, महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचेs नेते जयंत पाटील, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यावेळी उपस्थित असतील. दरम्यान, अपक्ष लढणारे उमेदवार आणि इतर पक्षांकडूनही आपापले जाहिरनामे प्रसिद्ध केले जात आहेत.

****

दरम्यान, काँग्रेस पक्षाची सत्ता असलेल्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी काल मुंबईत पत्रकार परिषद घेतली. तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार आणि हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सुख्खू यामध्ये सहभागी झाले होते. काँग्रेसनं या राज्यांमध्ये जाहीरनाम्यात दिलेली आश्वासनं पाळली नाहीत, अशा खोट्या जाहिराती देऊन भाजप जनतेची दिशाभूल करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

****

आपल्याकडील तरुण-तरुणींमध्ये बुद्धी आणि गुणांची कमतरता नाही, मात्र, राज्यकर्ते आणि राजकारण्यांमध्ये ती ओळखण्याच्या क्षमतेचा अभाव असल्याचं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी म्हटलं आहे. यवतमाळ जिल्ह्यातल्या उमरखेड इथल्या प्रचारसभेत ते काल बोलत होते. तर, ही निवडणुक म्हणजे प्रस्थापितांच्या विरोधात विस्थापितांची लढाई असल्याचं मत स्वराज्य पक्षाचे पक्षप्रमुख छत्रपती संभाजीराजे यांनी व्यक्त केलं. ते काल नवी मुंबई इथं प्रचार मोहिमेदरम्यान वार्ताहरांशी बोलत होते.

****

विधानसभा निवडणुकीसाठी ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग या पात्र मतदारांच्या घरी जाऊन टपाल मतपत्रिकांद्वारे मतदान करुन घेण्याची प्रक्रीया राज्यभरात सध्या सुरु आहे. या पार्श्वभूमीवर सांगली जिल्ह्याच्या मिरज तालुक्यात भोसे इथल्या चंपाबाई मगदूम या शंभर वर्षीय महिलेने आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

****

विधानसभा निवडणूकीसाठी २० नोव्हेबर २०२४ रोजी मतदान होणार असून, मतदान करण्यासाठी, नागरिकांना मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर बारा प्रकारचे ओळखपत्र पुरावे ग्राह्य धरले जाणार असल्याचं निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आलं आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

कोल्हापूर जिल्ह्यात ८० टक्क्यांहून अधिक मतदानाचं लक्ष्य गाठण्यासाठी जिल्ह्यातले सर्व मतदार मिळून `आम्ही कोल्हापुरी जगात लय भारी – पार करणार ८० टक्केवारी` असा संकल्प करुया, असं आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी काल केलं. कोल्हापूर इथं मतदान जनजागृतीसाठी आयोजित लोकशाही दौडचा प्रारंभ त्यांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते.

****

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं पालघर जिल्ह्यातल्या मतदारांमध्ये जनजागृती करुन त्यांना मतदानासाठी प्रवृत्त करणं, याद्वारे त्यांच्यात राष्ट्रीय कर्तव्य भावना जागृत करण्यासाठी स्वीप मोहिम सुरू आहे. यासंदर्भातील चित्ररथ उद्या शहरात येत आहे.

****

छत्तीसगड राज्यातील बिजापूर जिल्ह्यातील कुगलेर येथील रहिवासी असलेल्या लक्ष्मी बंडे मज्जी नामक ४२ वर्षीय नक्षल महिलेने ९ नोव्हेंबरला गडचिरोली पोलिस आणि केंद्रीय राखीव दलापुढे आत्मसमर्पण केलं.

लक्ष्मी मज्जी ही २०१७ मध्ये भामरागड दलम आणि इंद्रावती एरिया कमिटीमध्ये चेतना नाट्य मंचची सदस्य म्हणून भरती झाली. आजतागायत ती तेथे कार्यरत होती. राज्य शासनाने तिच्यावर २ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. तिचा गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभाग आहे काय, याविषयी पडताळणी सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले. २००५ मध्ये आत्मसमर्पण योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत ६७८ नक्षल्यांनी पोलिसांपुढं आत्मसमर्पण केलं आहे.

****

भारताच्या पंकज अडवाणीनं कतारच्या दोहा इथं सुरू असलेल्या जागतिक बिलियर्ड्स स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं आहे. काल झालेल्या अंतिम फेरीत त्यानं इंग्लंडच्या रॉबर्ट हॉलचा पराभव केला. पंकज अडवाणी यापुर्वी २७ वेळेच्या विश्वविजेतेपदाचा मानकरी आहे. दरम्यान, या स्पर्धेत भारताच्या सौरव कोठारीनं कांस्यपदक पटकावलं.

****